**Punya Nagari, P-6, Nov 7**

# ओरिएंट इलेक्ट्रिक महाराष्ट्रातील हिस्सा

## २५ टक्क्यांपर्यंत वाढविणार : अतुल जैन

**नागपूर :** 'ओरिएंट फॅन्स' या ओरिएंट इलेक्ट्रिकच्या मालकीच्या कंपनीकडून देशातील सर्वात मोठा बाजार असलेल्या महाराष्ट्रात विस्तार योजना आखण्यात आली असून, वर्तमानात महाराष्ट्रात असलेल्या १६ टक्के वाटा २५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे प्रयत्न केले जात असल्याची माहिती ओरिएंट इलेक्ट्रिकचे व्यवसाय प्रमुख अतुल जैन यांनी दिली. पश्चिम भारत आणि विशेषतः महाराष्ट्रात या ब्रॅण्डचे नाव मोठे झाले. आता विदर्भात आमचे अस्तित्व वाढविण्याची मोठी संधी असून, त्याच अनुषंगाने नागपुरात नव्या वितरकांची नेमणूक केल्याचेही जैन म्हणाले.